दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –२९८ | मंगळवार,दि.०२ जुलै २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-298 | Tuesday, Dt.02 July 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीड लैंगिक शोषण प्रकरणाची एसआयटी चौकशी

## महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात होणार तपास, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

मुंबई /वृत्तसंस्था

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी बीड येथील एका कोचिंग क्लासेसमध्ये अल्पवयीन मुलीच्या झालेल्या लैंगिक शोषणाची एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली. प्रस्तुत प्रकरणाची संभाव्य व्याप्ती तथा संवेदनशीलता लक्षात घेऊन सरकारने या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याचा निर्णय घेईल. एका वरिष्ठ दर्जाच्या महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात ही समिती कालबद्धपणे आपला तपास करून या गुन्ह्याचा छडा लावेल. या प्रकरणी कुणालाही पाठिशी न घालता पीडित मुलींना न्याय देण्यात येईल, असे ते म्हणालेत.

भाजप सदस्य चेतन तुपे यांनी बीडमधील लैंगिक शोषणाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. गुरू–शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारे कृत्य या महाराष्ट्रात घडले आहे. बीडमधील एका कोचिंग क्लासेसमध्ये एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण झाले आहे. सध्या या प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक झाली आहे. त्यांच्यावर पोस्कोचा गुन्हाही दाखल करण्यात आला. पण या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज आहे. सरकारने या प्रकरणी एसआयटी चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी चौकशीची घोषणा केली.

मुख्यमंत्र्यांनी केली एसआयटी चौकशीची घोषणा

मुख्यमंत्री विधानसभेत बोलताना म्हणाले की, सभागृहाचे सदस्य चेतन तुपे यांनी बीडमध्ये घडलेल्या एका अतिशय गंभीर घटनेचा मुद्दा उपस्थित केला. कोचिंग क्लासेसला येणाऱ्या मुलींचे लैंगिक शोषण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. त्यातील एका पीडित मुलीने व तिच्या आईने हिंमतीने या प्रकरणात गुन्हा दाखल केला. त्यानंतर या प्रकरणाची वस्तुस्थिती बाहेर आली. या अंतर्गत पोस्को कायद्यांतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### नराधमांना कठोर शिक्षा मिळेल

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, या प्रकरणाची व्याप्ती कुठपर्यंत आहे? कुणाचा वरदहस्त आहे का? याला राजकीयदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या वेगवेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे का? आदी तपास या प्रकरणी केला जाईल. त्यातून पीडित मुलींना योग्य न्याय मिळवून देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे मी सभागृहाला व सदस्यांना ग्वाही देतो की, या प्रकरणातील एसआयटी कालबद्ध तपास करून या गुन्ह्याचा छडा लावेल. पीडित मुलींना न्याय देईल. तसेच अशा प्रकारच्या नराधमांना कठोर शिक्षा मिळेल. एवढेच नाही तर त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही शिक्षा मिळेल अशी व्यवस्था केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

सन्माननीय सदस्याने या प्रकरणी काही मुद्दे उपस्थित केलेत. या प्रकरणी आरोपींची दोनच दिवसांची कोठडी का मागण्यात आली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. याची चौकशी केली जाईल. या प्रकरणी बीडसह संपूर्ण राज्यात रोष पसरला आहे. कारण, या प्रकरणाची व्याप्ती अधिकची असू शकते. एक मुलगी हिंमतीने पुढे आली, पण ही घटना अनेक मुलींसोबत घडल्याचा संशय आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती व संवेदनशीलता लक्षात घेऊन सरकारने या प्रकरणाची वरिष्ठ दर्जाच्या आयपीएस महिला अधिकाऱ्याच्या नेतृत्वात एक एसआयटी चौकशी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. एसआयटीच्या माध्यमातून या गुन्ह्याचा तपास केला जाईल.

पीडितेने बालकल्याण समितीसमोर सांगितला गुन्ह्यातील घटनाक्रम, आई–वडील रडले

(उर्वरीत पान २ वर)

# विद्युत लाईनचा शॉक बसल्याने १२ वर्षीय प्रणव टेकाळेचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी । जामखेड



क्रिकेट खेळताना स्लॅपवरती गेलेला बॉल फ्लेक्सच्या लोखंडी पाईप ने काढत असताना घराजवळील मुख्य विज वाहीनीचा शॉक लागुन १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.ही घटना जामखेड शहरातील खर्डाचौका जवळील टेकाळे नगर या ठिकाणी घडली. विजेच्या तारांना चिकटून मृत्यू झालेली ही आठ दिवसांतील तिसरी घटना आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जामखेड शहरातील खर्डा चौकातील टेकाळे नगर या ठिकाणी सोमवार दि ३० जुन रोजी सायंकाळी साडेपाच वाजता प्रणव प्रशांत टेकाळे, वय १२, वर्षे रा. टेकाळे नगर हा आपल्या मित्रांनसोबत घराजवळ क्रीकेट खेळत होता. प्रणव टेकाळे याच्या

(उर्वरीत पान २ वर)

# शक्तिपीठ विरोधात शेतकऱ्यांची वज्र्यमूठ

## जिल्ह्यात कृषिदिनी शेतकऱ्यांचा चक्काजाम आंदोलन

बीड / प्रतिनिधी

शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा कडाडून विरोध होत असून राज्य सरकारने हा प्रस्तावित महामार्ग तात्काळ रद्द करावा यासाठी राज्यातील शेतकऱ्यांसह बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई तालुक्यातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित शेतकऱ्यांनी मंगळवार दि १ रोजी कृषिदिनी अनेक ठिकाणी रास्तारोको करून या महामार्गास तीव्र विरोध केला. अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर, धायगुडा पिंपळा आणि परळी

(उर्वरीत पान २ वर)



### तर आंदोलन अधिक तीव्र होईल......

सरकार शेतकरी विरोधी भूमिका घेत असून शेतकऱ्यांना भूमिहीन करून देशोधडीला लावणारा शक्तीपीठ महामार्गाच्या सीमांकन आणि जमीन संपादन करण्यासाठी सरकार पोलिसी बळाचा वापर करत आहे. अधिकारी देखील शेतकऱ्यांना धमक्या देण्याचा प्रकार बीड जिल्ह्यात सुरू असून सरकारच्या ह्या सर्व दडपशाही विरोधात बीड जिल्ह्यातील शेतकरी पेटून उठला असून सत्ताधारी जर सत्तेचा आणि बळाचा गैरवापर करत असतील तर हे आंदोलन यापेक्षा अधिक तीव्र स्वरूप घेईल.एड.अजय बुरांडे किसान सभा, बीड

# बीड गुन्हे शाखेने जप्त केले हजारोंचा गुटखा



परळी / प्रतिनिधी

बीड गुन्हे शाखेचे एक पथक अंबाजोगाई पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना चारचाकी वाहनातून राज्यात प्रतिबंधित पान मसाला व गुटखा वाहतूक होत असल्याच्या खबरीवरून यशस्वी सापळा रचत

(उर्वरीत पान २ वर)



# रोटरीने शेतामध्ये जाऊन राबणाऱ्या हातांचा केला सन्मान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शेतीमध्ये अहोरात्र मेहनत करून काम करणाऱ्या ३० महिलांचा त्यांच्या शेतात जाऊन त्यांना सनकोट व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने मंगळवारी तालुक्यातील वरवटी येथे राबविण्यात आला.

कृषी दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लबच्या अध्यक्षा

(उर्वरीत पान २ वर)



## संपादकीय

# 'मावशी'ची माघार

पहिलीपासून त्रिभाषा धोरण राबविण्याचे म्हणजेच हिंदी सक्तीबाबतचे दोन्ही शासन निर्णय मागे घेण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. आता याबाबत तज्ज्ञांची समिती नियुक्त करून अहवाल आल्यानंतरच सरकार निर्णय घेणार आहे.

'राष्ट्रभाषा हिंदीला विरोध म्हणजे देशद्रोह' अशा गर्जनांपासून सुरू झालेला पहिलीपासूनच्या हिंदीसक्तीचा प्रवास वळणावळणाने अखेर सपशेल माघारीवर येऊन थांबला आहे. गेल्या दोन महिन्यांत राज्य सरकारने यासंदर्भात अनेक कोलांटउड्या मारल्या, शाब्दिक खेळ केले आणि वकिली युक्तिवादही केले; मात्र विरोधात उभे राहू पाहणारे मराठीजनांचे बिगरराजकीय संघटन, ठाकरे बंधूंची मोर्चेबांधणी आणि मुख्य म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वीच सरकारने शस्त्रे म्यान केली.

पहिलीपासून त्रिभाषा धोरण राबविण्याचे म्हणजेच हिंदी सक्तीबाबतचे दोन्ही शासन निर्णय मागे घेण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. आता याबाबत तज्ज्ञांची समिती नियुक्त करून अहवाल आल्यानंतरच सरकार निर्णय घेणार आहे. हिंदी सक्तीला विरोध सुरू झाल्यानंतर लगेचच प्रतिष्ठेचा प्रश्न करून पोकळ समर्थनांचे फुगे उडवण्याऐवजी हा विषय तज्ज्ञांकडे सोपवला असता, तर आजची मुखभंगाची वेळ आली नसती. हिंदीच्या सक्तीच्या निमित्ताने मराठीजनांनी भाषेबाबत दाखविलेल्या एकजुटीचा हा विजय म्हणता येईल.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा (एनईपी) हवाला देऊन हिंदीसक्ती रेटण्याच्या निर्णयाभोवती सुरुवातीपासूनच संशयाचे धुके निर्माण झाले होते. 'एनईपी'मधील त्रिभाषा सूत्रात 'पहिलीपासून' आणि 'हिंदी अनिवार्य' असे कोणतेही उल्लेख नसताना राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये हळूच या हिंदीसक्तीचा चंचूप्रवेश घडविण्यात आला. मराठी शाळांमध्ये पहिलीपासून मराठी आणि इंग्रजी या दोनच भाषा शिकवल्या जातात. इतर माध्यमांच्या शाळांमध्ये मात्र या दोन्ही भाषांसह त्या शाळेच्या माध्यमाची भाषाही शिकवली जाते; त्या पार्श्वभूमीवर मराठी शाळांमध्ये तिसरी हिंदी भाषा 'अनिवार्य' करण्याच्या १६ एप्रिलच्या 'शासन निर्णया'वरून समर्थन आणि विरोध असे 'हत्ती आणि चार आंधळ्यांचे आख्यान' महाराष्ट्रात सुरू झाले.

'सहावीपासून मुले हिंदी शिकतच आहेत; पहिलीपासून ते ओझे त्यांच्या डोक्यावर नको,' अशी पालक-शिक्षकांची अत्यंत साधी मागणी होती. मात्र, त्यावरून रण माजले. 'हिंदीला विरोध म्हणजे देशद्रोह' असे युक्तिवाद झाले. 'हिंदी विरुद्ध मराठी' असे चित्र रंगवून झाले आणि नेत्यांची मुले कोणत्या शाळेत शिकतात, याचेही उत्खनन झाले. त्यामुळे हा विषय भाषिक अस्मितेच्या मार्गाने निवडणुकीच्या आखाड्यात आला. प्रारंभी वीस विद्यार्थ्यांच्या किमान अटीवर अन्य भाषा शिकण्याचे स्वातंत्र्य देण्याची तयारी दर्शवून हिंदीसक्ती रद्द केल्याचे भासवण्याचा प्रयत्न झाला; पण ही मागच्या दाराने हिंदीसक्तीच असल्याने विरोधाची धार तीव्र झाली. नंतर हिंदीचे मौखिक शिक्षण देण्यातून एक पाऊल मागे घेण्याचाही प्रयत्न झाला. अखेरीस मुदत नसलेल्या तज्ज्ञ समितीकडे पाठवून हा विषय थंड्या बस्त्यात गेला.



# खुनाच्या प्रकरणात अॅड.अविनाश गंडले यांच्या प्रभावी युक्तीवादामुळे दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

प्रतिनिधी । बीड

दि. ०१/०८/२०२५ रोजी फिर्यादी नितीन नारायण माने याने पोलिसांनी दिलेल्या माहिती आधारे ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथे तक्रार दिली की, चऱ्हाटा रोडवरील रेल्वे ब्रिजच्या खाली मृत अवस्थेत एक प्रेत पडलेला आहे. सदरील माहिती फिर्यादीस मिळाल्यानंतर तो महाबळेश्वर येथे असल्याने त्यांनी त्याच्या घरच्या नातेवाईकांना घटनास्थळी पाठवून शहानिशा केली असता सदरील मृतप्रेत हे फिर्यादीचा भाऊ नामे पांडुरंग उर्फ पप्प्या नारायण माने यांच्या आहे हे निष्पन्न झाले. घटनेच्या दिवशी फिर्यादी सोबत विकास वायकुळे व ओंकार लकडे हे दोघे असल्याने केवळ संशयावरून त्यांच्याविरोधात तक्रार दिली.

पोलिसांनी प्रकरणाचा तपास करून सदरील प्रकरणांमध्ये मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर मा. न्यायालयात सेशन केस क्रमांक २१९/२०२३ हे प्रकरण करण्यात आले आरोपींच्या वतीने ड. अविनाश पं. गंडले यांनी तपासी अधिकाऱ्यासह एकूण १२ साक्षीदार तपासले. आरोपी पक्षाचा बचाव करताना सातत्यपूर्ण पाठपुरावा, अभ्यासू युक्तिवाद तसेच आरोपींचा प्रस्तुत प्रकरणांमध्ये कसल्याही प्रकारचा सहभाग नसल्याचे ड. अविनाश पं. गंडले मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही आरोपींची कोणताही सबळ पुरावा नसल्याने तसेच आरोपींवर आरोप सिद्ध न झाल्याने निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे लक्ष लागले होते.

केवळ एक वर्ष सहा महिने अठ्ठावीस दिवसांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने ड. अविनाश पं. गंडले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आरोपींच्या वतीने ड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले तर त्यांना या कमी ड. इम्रान पटेल, ड. गोवर्धन पायाळ,

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायलयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५२१ / २०२५**
**भानुदास भिमा राठोड विरूध्द निरंक**
**(मार्फत एस. एल. मेघारे गेवराई)**

ज्याअर्थी मयत नवनाथ भानुदास राठोड हे / हया दिनांक १०/०५/२०२५. रोजी केकतपांगरी ता. गेवराई जि. बीड. येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार १. भानुदास भिमा राठोड वय: ६० वर्षे, धंदा: शेती रा. रामनाईक तांडा, केकतपांगरी ता. गेवराई जि.बीड २. कांताबाई भानुदास राठोड वयः ५६ वर्षे, पंदा: शेती रा. सदर ३ प्रिया नवनाथ राठोड वय: २४ वर्षे धंदा शेती व घरकाम रा. सदर ४. हृदय नवनाथ राठोड वय: ०२ वर्षे अ.पा.क. आई अर्जदार क्र. ३ प्रिया भ्र नवनाथ राठोडयांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे नवनाथ भानुदास राठोड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

**जाहीर प्रगटन**
**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ४ थे सह दिवाणी न्यायाधीश,**
**क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ७१६/२०२५**
**श्वेता विरुद्ध निरंक अँड. जरांगे प्रतीभा एन.**

अर्जदार :- १) श्वेता प्र. संतोष लोहिया वय ४० वर्षे भंदा घरकाम
रा. मौजकर पार्क, पांगरी रोड, बीड ता.जि.बीड
२) संतोष श्रीकिसन लोहिया वय ४६ वर्षे शंदा शेती
रा. जटाशंकर मंदिराजवळ, थिगळे गल्ली, बडीराज गल्ली, बीड ता.जि.बीड

**विरुध्द निरंक**

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र ( Heirship Certificate) मिळणे बाबत...**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे गोविंद पि. संतोष लोहिया यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे गोविंद पि. संतोष लोहिया रा. मौजकर पार्क, पांगरी रोड, बीड, ता.जि.. बीड यांचा मृत्यु दिनांक : १४.०३.२०२५ रोजी बीड, ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क १ ही मयताची आई असून, अर्जदार क २. हे मयताचे वडील आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गोविंद पि. संतोष लोहिया यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १७/०७/२०२५.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड




# बंदी असलेला गुटखा तहसीलमध्ये कर्मचारी कामावर चघळतात

# कार्यालयात ध्रुम्रपानास सक्त मनाई फक्त नावालाच

प्रतिनिधी । धारूर

धारूर तहसील कार्यालयातील कर्मचारी हे आपल्या कामावर असतांना कार्यालईन वेळेमध्ये बंदी असलेला गुटखा चघळत आहेत. याबाबत धारूर तहसीलदार यांना याचे कसलेही गांभीर्य दिसत नाही शासकिय कार्यालयात ध्रुम्रपानास सक्त मनाई हे फलक फक्त नावालाच लावले आहेत का ? असा प्रश्न उपस्थीत होतांना दिसत आहे. धारूर तहसील येथे दि.१ जुलै २०२५ रोजी हा प्रकार उघडकीस आला आहे. धारूर तहसील मधील हे कर्मचारी दुपारी १२:४१ मिनिटाला कार्यालईन वेळेत कामावर असतांना गुटखा खांताना दिसत आहेत हा व्हिडिओ आता सोशल मिडियावर व्हायरल होत आहे याबाबत धारूरचे तहसीलदार व वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे मळेकरवाडी घाटात डांबरीकरण सुरू




पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील पैठण-पंढरपूर पालखी मार्गावरील मळेकरवाडी घाटातील १२०० मी. रस्ता डांबरीकरणाचे आ. सुरेश धस यांच्य सततच्या पाठपुराव्याने काम सुरु झाले आहे. आ. सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे पाटोदा तालुक्यातील मळेकरवाडी घाटामधील पैठणहपंढरपूर पालखी मार्गाचा १२०० मीटर लांबीचा रस्ता डांबरीकरण करण्यास मंजुरी मिळाली होती. दि. ३० रोजी प्रत्यक्षात या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची सुरुवात आ. सुरेश धस यांच्या सुचनेनुसार तालुकाध्यक्ष भागवत येवले यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आली. या रस्त्याचे काम आता प्रगतीपथावर आहे. या रस्त्याचे काम सुरू झाल्याने डोंगरकिन्ही, नाळवंडी, कारेगाव या गावातील आणि या मार्गावरून दळणवळण करणाऱ्या सर्व वाहनधारकांकडून समाधान व्यक्त होत आहे. रस्त्याचे काम सुरू असल्याने तात्पुरता हा मार्ग पूर्णता बंद करण्यात आला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये हा मार्ग वाहतुकीसाठी सुरू होईल. तरी या मार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्या सर्व वाहनधारकांनी पुढील काही दिवसांसाठी डोंगरकिन्ही गारमाथा, उंबरविहारा, तांबाराजुरी, चुंबळी फाटा या पर्यायी मार्गाचा वापर करावा असे ही म्हटले आहे.

**पान १ वरून...**

**बीड लैंगिक..**

दुसरीकडे, या प्रकरणातील पीडित मुलीने बालकल्याण समितीपुढे आपल्यावरील आपबीती कथन केली आहे. ती म्हणाली, शिक्षक खाटोकरने मला केबिनमध्ये बोलावून बॅड टच केला. त्यामुळे मी प्रतिकार केला,त्याला लाथा-बुक्क्यांनी मारले. पण तो ऐकत नव्हता. त्याने मला कपडे काढायला लावले, माझे फोटोही काढले. सहनशीलतेचा अंत झाला म्हणून मी पोलिसांत तक्रार दिली. त्याला अद्दल घडली पाहिजे. पोटच्या मुलीचा झालेला हा छळ ऐकून तिचे आई, वडिलही धाय मोकलून रडले.

सोमवारी पीडीतेला बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. यावेळी तिने समितीसमोर सगळा घटनाक्रम उलगडला. खाटोकर याने तिला सर्वाधिक त्रास दिला. वर्गातही इतर विद्यार्थ्यांसमोर त्याचे माझ्याशी वागणे चांगले नव्हते. हिने मला एक प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर मी देणार आहे असे म्हणून तो क्लास संपल्यानंतर केबिनमध्ये बोलावत होता. तो ऐकत नव्हता, तर विजय पवारने हाच प्रकार केल्याचे पीडीता म्हणाली.

पीडितेस महिला सहायक

बालकल्याण समितीने पीडीतेची स्थिती पाहून तिला एक महिला सहायक दिली आहे. तिचे समुपदेशन करुन धक्क्यातून बाहेर पडण्यास मदत करणे, करिअरच्या दृष्टीने मदत करणे, आत्मविश्वास उंचावणे, कायदेशीर मदत ही कामे महिला सहायक करेल. या निर्णयामुळे पीडीतेला मदत होईल.

**शक्तिपीठ विरोधात...**

तालुक्यातील तळेगाव या ठिकाणी शेतकरी महिला आणि त्यांचे कुटूंबीय एकत्र येत रास्ता रोको करत शासनाचा निषेध करत या महामार्गाला विरोध केला.

राज्यात शेतकऱ्यांना खोटी प्रलोभने व पोलीस बाळाची भीती दाखवत सीमांकन करण्याच्या प्रयत्न शासन व प्रशासन करत असून शेतकरी आता या गोष्टीला बळी न पडता शक्तीपीठ महामार्ग विरोधात एकवटला आहे. याचाच भाग म्हणून जिल्ह्यातील परळी व अंबाजोगाई तालुक्यातील ज्या गाव शिवारातून हा महामार्ग प्रस्तावित असून या महामार्गामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित अबाल वृद्ध शेतकरी आणि महिला यांनी बीड जिल्हा किसान सभेच्या नेतृत्वाखाली एकत्र येत अनेक ठिकाणी रास्ता रोको केला. धायगुडा पिंपळा या ठिकाणी आंदोलन करणाऱ्या शेतकरी पुरुष महिलांना अटक करून दुपारी सोडण्यात आलं किसान सभेचे एड.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, भाई मोहन गुंड कॉ.भगवान बडे, कॉ.मदन वाघमारे

व्यंकट ढाकणे, सुशील शिंदे, मारुती इरलापल्ले, एड.जावेद पटेल, दीपक शिंदे, अरुण पाटील, पुंडलिक धायगुडे, बावणे विठ्ठल,मीनाताई डांगे, आशाबाई पवार, भानुदास मुंडे, मारुती डांगे याच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो शेतकरी या ठिकठिकाणी रास्तारोको मध्ये सहभागी झाले होते.

**विद्युत लाईनचा...**

घराजवळुनच मुख्य विद्युत वाहीनीच्या तारांची लाईन गेली आहे. क्रिकेट खेळत असताना बॉल स्लॅपवरती गेला या जवळच मुख्य विजेच्या तारा होत्या. प्रणव याने फ्लेक्सचा लोखंडी पाईप सदरचा बॉल काढण्यासाठी घेतला व बॉल काढत असताना त्याच्या हातातील पाईपचा या लाईटच्या तारांना धक्का लागला व त्याचा मृत्यू झाला. यावेळी त्याठिकाणी असलेले त्याचे चुलते नातेवाईकांनी त्याला तातडीने रुग्णालयात नेले मात्र पुर्वीच त्याचा मृत्यू झाला. जामखेड पोलीस स्टेशनला याची खबर मयूर टेकाळे यांनी दिल्याने जामखेड पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.शहरातील सदाफुले वस्ती येथील टेकाळे नगर येथे विजेचा तारेला स्पर्श होऊन प्रणव टेकाळे वय १२ वर्षीय या बालकाचा मृत्यू झाला आहे. हि घटना संपूर्ण

**पान १ वरून...**

शहरात पसरली होती. पण महावितरणच्या अधिकाऱ्यांना काहीही माहिती नव्हते. घटनेनंतर तीन तास झाले तरीही कोणीही महावितरणचे अधिकारी घटनास्थळी गेले नव्हते.आठ दिवसात तिघांचा मृत्यू ; मागील आठ दिवसांपूर्वीच जामखेड तालुक्यातील बाळगव्हाण येथील उसाच्या शेतात खत टाकण्यासाठी गेलेल्या बाप- लेकाचा शेतातील खाली पडलेल्या विजेच्या तारांना चिकटून जाग्यावरच मृत्यू झाला होता. विद्युत महामंडळाच्या गलथान कारभारामुळे या दोघांचा मृत्यू झाला असल्याचे ग्रामस्थांन कडुन बोलले जात होते. यानंतर खर्डा- बाळगव्हाण येथील वायरमन यांना दोषी ठरवुन मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची जामखेड तालुक्यातील येत्या आठ दिवसातील ही तिसरी घटना आहे. मागिल आठ दिवसात विजेच्या तारांना चिकटून तिघांचा मृत्यू झाला आहे

**रोटरीने शेतामध्ये...**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायलयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५४८/२०२५**
**चंद्रभागा भ्र. भिमराव नागरे व ईतर विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. आय. बी. नागरे,गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे भिमराव पि. माणिकराव नागरे हे/ हया दिनांक ३०/०९/२०२३ रोजी मौजे संगमजळगांव, ता. गेवराई, जि. बीड येथे झाले/ झाल्या आहेत, अर्जदार क. १. चंद्रभागा भ्र. भिमराव नागरे, वय- ७८ वर्षे, धंदा- घरकाम, रा. संगमजळगांव, ता. गेवराई, जि. बीड, २. तुकाराम पि. भिमराव नागरे, वय- ४८ वर्षे, धंदा- शेती, रा. संगमजळगांव, ता. गेवराई, जि. बीड, ३. राजाभाऊ पि. भिमराव नागरे, वय- ४६ वर्षे, धंदा- शेती, रा. संगमजळगांव, ता. गेवराई, जि. बीड, यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भिमराव पि. माणिकराव नागरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १३/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

**पान १ वरून...**

प्रा.रोहिणी पाठक,प्रकल्प प्रमुख डॉ. अल्का तडकलकर, सह प्रकल्प प्रमुख मंदाकिनी गित्ते,व रोटरीचे सदस्य वरवटी येथील शेतात गेले. तिथे शेतात काम करणाऱ्या महिलाना एकत्रित केले. त्यांना गुलाब पुष्प व शेतात काम करताना संरक्षण देणाऱ्या सनकोट चे वाटप ३० शेतकरी महिलाना करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांनी गायलेल्या अभंगातून रोटरी प्रति कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी सरपंच चाटे, मुख्याध्यापक नेहरकर यांची उपस्थिती होती.शेतात राबणाऱ्या हातांचा सन्मान करत त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपण रोटरी क्लब च्या माध्यमातून ग्रामीण भागात विविध उपक्रम राबविणार असल्याचे रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक यांनी यावेळी सांगितले.

**बीड गुन्हे शाखेने ...**

हजारो रुपयाचा गुटखा व चारचाकी वाहन जप्त केले.या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार दि ०१ पहाटेच्या दरम्यान पोउपनी सुशांत सुतळे, पो.हवा रामचंद्र केकान,पोना.गोविंद भताने,पोशी.सचिन आंधळे यांच्या पथकास मिळालेल्या खबरी वरून अजय उर्फ ऋषिकेश शिंदे (रा.होळ) हा अवैधरित्या गुटख्याची स्वतःच्या कारमधून वाहतूक करत असताना सदर ठिकाणी छापा टाकून त्याच्या चारचाकी गाडी मधून वेग वेगळ्या कंपनी चा पान मसाला ,गुटखा आदी ४६,८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याचे काम सुरू आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस. एच. पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४८०/२०२५**
**अनुसयाबाई विरूध्द निरंक**
**(मार्फत- अॅड.बी.एम.मुळे)**

ज्याअर्थी मयत नामे पांडुरंग पिता धाराजी भोजगुडे हे दिनांक १०/१२/२०२४ रोजी रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार १. अनुसयाबाई पांडुरंग भोजगुडे, वय ८७ वर्षे, धंदा शेती, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई जि. बीड २. गणपत पिता पांडुरंग भोजगुडे, वय ५६ वर्षे धंदा घरकाम, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड ३. सुंदर पिता पांडुरंग भोजगुडे, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे पांडुरंग पिता धाराजी भोजगुडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ३०/०७/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

# माणुसकी सेवा फाऊंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती

## सामाजिक बांधिलकी, प्रशासनात सुसंवाद आणि शेवटच्या घटकांसाठी संघर्षरत नेतृत्व



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) संलग्न माणुसकी सेवा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती नुकतीच करण्यात आली. सामाजिक कार्यात सक्रिय आणि ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ही योग्य निवड असल्याचे सर्वत्र मानले जात आहे. वेदपाठक यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष, प्रवक्ते व माणुसकी सेवा फाऊंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष महेश भाऊ शिंदे यांच्या हस्ते अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महेशभाऊ शिंदे हे सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांचे विचार व धोरणे तळागाळात पोहोचविण्यासाठी महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात झंजावाती संवाद दौरे करीत आहेत. सामाजिक माध्यमातून प्रशासन, शासकीय योजना आणि विकासाचे मॉडेल ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविणे, जनतेच्या अडचणी प्रशासनापर्यंत नेऊन त्या मार्गी लावणे, आणि सामान्य नागरिकाचे जीवनमान उंचाविण्यासाठी ते अहोरात्र झटत आहेत. माणुसकी सेवा फाऊंडेशन हे समाजासाठी समर्पित कार्य करणारे आहे. या दूरदृष्टीमुळेच माणुसकी सेवा फाऊंडेशनने प्रत्येक जिल्हा, तालुका व ग्रामीण पातळीवर शाखा स्थापनेचे अभियान हाती घेतले आहे. सामाजिक जाणीवा असलेले कार्यकर्ते, युवक व महिलांचा सक्रिय सहभाग यातून घडतो आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र केवळ सामाजिक मदतीपुरते न राहता शासकीय योजनांचे प्रबोधन, आरोग्य शिबिरे, शिक्षणवाढ, शेतकऱ्यांसाठी कृषी मार्गदर्शन, महिला व बालकल्याण, व्यसनमुक्ती, रोजगार निर्मिती यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर आधारित आहे. आपल्या निवडीबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रकाश वेदपाठक यांनी सांगितले की, 'माझी ही नियुक्ती म्हणजे पदापेक्षा जबाबदारी ही मोठी आहे. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत शासनाच्या विविध योजना आणि न्याय पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. सन्माननीय महेश भाऊंनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी प्रत्यक्ष कामातून सिद्ध करीन,' असे आश्वासन प्रकाश वेदपाठक यांनी आपल्या निवडीनंतर उपस्थितांशी संवाद साधताना व्यक्त केले. वेदपाठक यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातून उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. या निवडीनंतर अंकुश गंगावणे (बीड जिल्हाध्यक्ष), संजय तेलंग, सय्यद अमजद, प्रवीण सोळंके, शेख नासेर,

# पाटोदा शहरात सुरक्षेच्या दृष्टीने नगरपंचायत,पोलीस प्रशासन,शैक्षणिक संस्थांची संयुक्त बैठक

## विद्यार्थ्यांसह महिलांच्या सुरक्षेसाठी एकत्रित घेणार पुढाकार

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा शहरातील वाढते अपघात, महिला सुरक्षेचे प्रश्न, तसेच विद्यार्थी व पालकांच्या मनात असलेल्या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा नगरपंचायत कार्यालयात एक महत्त्वपूर्ण आणि व्यापक बैठक घेण्यात आली. या बैठकीत नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, पोलीस निरीक्षक जाधव साहेब, शिक्षण अधिकारी गांगुर्डे साहेब पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्यासह शहरातील शाळा, कॉलेज, व क्लासेसचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.या बैठकीत शहराच्या सर्वांगीण सुरक्षेसाठी खालील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले प्रत्येक चौकात होणार सीसीटीव्ही निगराणी नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी शहराच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण घोषणा करत सांगितले,

पुढील एका महिन्याच्या आत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली पाटोदा शहरातील सर्व प्रमुख चौक व



गर्दीची ठिकाणे येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. यामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण येईल, तसेच प्रशासनाला देखील मदत होईल.पाटोदा पोलीस स्टेशनचे दामिनी पथक होणार सक्रीय; शाळा-कॉलेजमध्ये 'किंवार कोड' बसवण्यात येणार पोलिस निरीक्षक जाधव साहेब यांनी विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेसाठी पुढील पावले उचलण्याची घोषणा केली. शहरातील सर्व शाळा, कॉलेज व क्लासेसमध्ये 'किंवार कोड' लावण्यात येणार असून विद्यार्थ्यांना कोणतीही आपत्कालीन परिस्थिती भासताच थेट पोलिसांशी संपर्क साधता येईल. यासोबतच दामिनी पथक अधिक सक्रिय करून परिसरात गस्त वाढवण्यात येईल. पाटोद्यातील जिल्हा परिषद शाळांमध्येही बसणार सीसीटीव्ही कॅमेरे शैक्षणिक वातावरण सुरक्षित व पारदर्शक व्हावे यासाठी शिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शिक्षण अधिकारी गांगुर्डे साहेब म्हणाले,पाटोदा तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे नियोजन आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा, शिक्षक-विद्यार्थी संबंध यामध्ये शिस्त व पारदर्शकता येण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरेल. संयुक्त समितीची स्थापना बैठकीत एक निर्णय घेण्यात आला की, नगरपंचायत, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग व शाळा-कॉलेज प्रतिनिधी यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वेळोवेळी आढावा घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने सुधारणा सुचवेल. पालक व नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा या सुरक्षाविषयक उपाययोजना राबवताना शहरातील नागरिक, पालक व तरुणांनी देखील सकारात्मक सहभाग द्यावा, असे आवाहन सर्व अधिकाऱ्यांनी व नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी केले आहे.



# श्री क्षेत्र गळनिंब ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आष्टीत स्वागत

आष्टी (प्रतिनिधी)

नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र गळलिंब येथील वै. ब्रम्हानंद महाराज बापु गुरुजी मालुंजेकर यांच्या आशीर्वादाने ८५ वर्षे वयाचे ह. भ. प. ज्ञानदेवा महाराज शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली गेली २६ वर्षापासून पायी पंढरपूर दिंडी जात आहे. रविवारी कासारी येथे दुपारी वै. पत्रकार दादा बन यांचे वडील आत्माराम बन यांच्या निवासस्थानी नाष्टा, चहापाणी कार्यक्रम झाला. त्यानंतर बीडसांगवीचे माजी सरपंच सुभाष गणगे यांच्यातर्फे किशोर हंबर्डे यांच्या पेट्रोल पंपावर चहापाणी झाले. येथे रिंगण व फुगडी भारुड झाले. यावेळी यशवंत खंडागळे, सुभाष गणगे, नेवासा कृ. उ. बाजार समितीचे माजी सभापती जनाभाऊ शेळके, पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार शरद रेडेकर आदि वारकरी उपस्थित होते. या पायी दिंडीचे दिनांक २५ जुन रोजी प्रस्थान झाले. दिनांक ५ जुलै रोजी दिंडी पंढरपूरला पोहचणार आहे.

# पाटोदा येथील मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे अपुरे राहिलेले काम पूर्ण करा-ॲड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे अपुरे राहिलेले काम पूर्ण करा- ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार. शासनाचे ३ कोटी रु उचलून मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे काम अजूनही अपुरेच आहे. पाटोदा शहरातील नागरिकांना सदरील पूलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करून वापर करण्यासाठी उपलब्ध करून देणे बाबत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार साहेब, सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई, विभागीय

आयुक्त, छ. संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड, मुख्य अधिकारी, नगर पंचायत पाटोदा यांना निवेदन दिले आहे. पाटोदा येथाल मांजरा नदीवर पूल कम बंधारा याचे तीन कोटी रुपयांचे बजेट मंजूर होऊन सदरील काम नगरपंचायत पाटोदा यांच्यामार्फत करण्यात आले होते. परंतु संबंधित ठेकेदार यांनी संपूर्ण तीन कोटी रुपये उचलून पुलाचे अर्धवट बांधकाम केले आहे. सदरील प्रकरणांमध्ये तांत्रिक मान्यता बोगस केल्यामुळे मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे जनहीत याचिका क्र. ०३/२०२२ दाखल झाली होती. यामध्ये न्यायालयाच्या आदेशाने नगरपंचायत मुख्य अधिकारी व इतर कर्मचाऱ्यासहित संबंधित ठेकेदार यांच्यावर पाटोदा पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा क्र. २१२/२०२२

दाखल होऊन पाटोदा प्रथम वर्ग दंडधिकारी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झालेले आहे, पाटोदा शहरातील नागरिकांसाठी जो पूल कम बांधरा होणार होता तो न झाल्यामुळे संबंधित भागातील शेतकरी व नागरिक यांना येण्या जाण्यासाठी खूप त्रास होत आहे. तसेच शासनाने संबंधित कामावर तीन कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सदरील पैसा हा जनतेचा पैसा आहे त्याचा अपव्यय झालेला आहे. परंतु उर्वरित काम होण्यासाठी यापूर्वी नगरपंचायत च्या वतीने ६५ लक्ष रुपयाची अतिरिक्त



मागणी करण्यात आली होती. तेव्हा उर्वरित काम होण्यासाठी ६५ लक्ष किंवा सध्याच्या मार्केट प्रमाणे जो काही खर्च येणार आहे, तो शासनाने त्वरित उपलब्ध करून द्यावा व सदरील काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करावे व जनतेला सदरील पूल कम बंधारा तयार करून जनतेच्या वापरासाठी खुला करून द्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

# अहिल्यानगर संत सावतामाळी मंदीर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यातील सुखद वाटचाल

## उद्योगपती आदित्य ताठे यांच्यासह ५० युवकांचा पायी दिंडीत प्रवास

आष्टी (प्रतिनिधी)

लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी आतुरलेल्या मनातून भक्ती, भाव, श्रद्धा, निष्ठा आणि अतिव ओढ असलेल्या हृदयाच्या प्रेम भावनेतून पायी दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्तपणे सहभागी होत. अहिल्यानगरचे उद्योगपती आदित्य ताठे यांच्यासह ५० युवकांचा पायी दिंडीत प्रवास सुरु आहे. दि.२६ जुन रोजी अहिल्यानगर शहरातील गारडकर मळ्यातील विठ्ठल रुक्मिणी व सावता माळी मंदीर देवस्थान येथुन पायी दिंडीचे प्रस्थान झालेले आहे. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता ही दिंडी दि. ५ जुलै रोजी पंढरपूरला पोहचणार आहे.

अहिल्यानगर शहरातील गारडकर मळ्यातील संत शिरोमणी सावता माळी मंदिर देवस्थानचा आषाढीनिमित्त पायी दिंडी सोहळा दिंडी संस्थापक ह. भ. प. रामदास गारडकर महाराज असुन संत श्रीपादबाबा चव्हाण (घोटी) यांच्या कृपाशीर्वादाने ह. भ. प. अरुण महाराज धाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि. २६ जुन रोजी दिंडीचे प्रस्थान झाले. दि. ५ जुलै रोजी पंढरीत दिंडी पोहचणार आहे. अहिल्यानगर शहरातील प्रसिध्द आडत व्यापारी तथा युवा उद्योगपती



अदित्य ताठे हे व ३०० वारकरी या पायी पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत. त्यांच्यासमवेत ५० युवक या पायी दिंडीत सहभागी आहेत. सोमवारी जेऊरजवळ असलेल्या सोलापूर व अहिल्यानगर या दोन जिल्ह्याच्या सीमेवर शेगुड गावी या दिंडीचे स्वागत व नाष्टा बिसेलरी पाण्याचे वाटप इंजि. पी. बी. बोडखे, चेअरमन अरुण सायकड आणि जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या वतीने करण्यात आले. दिडींत काही अंतर पायी चालत, ग्यानबा तुकाराम, विठ्ठल नामाचा जयघोष करीत प्रवास करुन आनंद घेतला. ही पायी दिंडी अहिल्यानगर, तुक्कडओढा, वाळुंज, शिराढोण, वाटेफळ, छत्तीशी रुई, बनपिंपरी, रमजान चिंचोली, आनंदवाडी, कोंबळी, चांदे बु, वालवड, कर्जत, कोरेगाव फाटा, पिसेमळा, आंबी जळगाव, शेगुड, माळंगी, बिनवडे वस्ती, विट, झरे, जेऊर, आदिनाथ कारखाना, कविटगाव, कंदर, टेंभुर्णि, नाळेवास्ती, दगडी अकोला, परिते, करकंब, पंढरपूर असा मार्ग आहे. विशेष म्हणजे आदित्य ताठे हे श्रीमंत कुटुंबामधील असुनही भक्ती भावाने आध्यात्मिक वातावरणात आनंद घेत पायी चालत आहेत. विठ्ठल नामस्मरणाच्या पवित्र वातावरणात रममान झालेले आहेत. अदित्य ताठे हे लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी मागील वर्षी आपल्या सौभाग्यवती सौ. सुवर्णासह वारीमधून पायी प्रवास सुरू केला होता. पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाची ओढ महाराष्ट्रासह देशभरातील भाविक भक्तांना लागली आहे. यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त द-याखोऱ्यातुन, डोंगरातून मिळेल त्या मार्गाने आणि ऊन, वारा, पाऊसात पंढरीकडे प्रवास करीत आहेत. देवयानी आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा ६ जुलै अर्थात रविवारी आहे. त्या अनुषंगाने ही भावीक मंडळी अत्यंत पवित्र मनाने विठुरायाच्या जयघोषात पंढरीकडे पायी प्रस्थान करीत आहेत. याच वारीमध्ये माऊलींच्या पायी दिंडी सोहळ्यात विठुरायाच्या नाम घोषात पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करत डोक्यावर पांढरीशुभ्र टोपी, गळ्यात पवित्र तुळशीची माळ आणि हातात टाळ घेऊन हे अदित्य ताठे पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनासाठी पायी दिंडी सोहळ्यात मार्गस्थ झाले आहेत. उद्योगपती अदित्य ताठे हे अभियंता पी. बी. बोडखे

# शासकीय आय.टी.आय आणि एस.टी.आगाराचे खासजीकरण करु नका

## बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शासकीय आय.टी.आय आणि एस.टी.आगाराचे खासजीकरण करू नका सदरचा प्रस्ताव तात्काळ थांबवा अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत सोमवारी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सोमवार, दिनांक ३० जुन २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र सरकारचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी नुकतीच एक बैठक बोलावून शासकीय आय.टी.आय. हे खासगी कंपनीकडे दत्तक देण्याचा निर्णय केलेला आहे. याचा आम्ही जाहिर निषेध करीत आहोत. सर्वप्रथम आय.टी.आय. या शिक्षणाचा उद्देश काय आहे हे पहावे लागेल. 'कुशल कामगार तयार करणे व विद्यार्थ्यांना स्ववलंबी बनविणे' हे आय.टी.आय.चे उद्दिष्ट असते. राज्यात शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था ४१९ आहेत. तर खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था ५८८ आहेत. या संस्थांमध्ये दरवर्षी जवळपास १ लाख ५० हजार विद्यार्थी प्रवेश घेतात आणि कुशल कामगार बनून बाहेर पडतात. आय.टी.आय मध्ये प्रवेश घेण्याचा विद्यार्थ्यांचा कल वाढलेला असून त्याचे कारण, विद्यार्थ्यांना आय.टी.आय. करीत असताना १२ वी ची परीक्षा देण्याची सवलत देण्यात आलेली आहे आणि आय.टी.आय. झाल्यास अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला थेट प्रवेश मिळण्याची सोय सुद्धा करण्यात आलेली आहे. मात्र सरकारचे म्हणणे आहे की, आय.टी.आय.ला प्रवेश घेवू इच्छिणाऱ्यांचे प्रमाण फार कमी झालेले आहे. हे साफ चूकीचे आहे. त्याचे कारण कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून आय.टी.आय. मध्ये सार्वजनिक खासगी भागीदारीला प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर येथे मंत्री व अधिकारी यांनी बैठक घेऊन कालबाह्य अभ्यासक्रम, जुने तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या अभावामुळे कुशल कारागीर देण्यास शासकीय आय.टी.आय. मागे पडत आहेत. असे मत व्यक्त केलेले आहे. हे खोटे असून सरकारचे मत हे नाकर्तेणाचे लक्षण दिसत आहे. शासकीय आय.टी.आय. मध्ये शिक्षक नेमणूकीची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात बेकारीला सामोरे जावे लागणार आहे. तसेच शासकीय आय.टी.आय. कडे आज रोजी मोठ्या प्रमाणात सरकारी जमीनी आहेत. त्या जमीनीवर खाजगी कंपन्या आपले उद्योग उभे करून सरकारची मालमत्ता कमी पैशाने हडप करू शकतात आणि वेगळी ज्यादा फीस आकारण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारने शासकीय आय.टी.आय. हे खासगी कंपनीच्या घशात घालण्याचे पाप करू नये. तसेच दुसरा मुद्दा असा की, महाराष्ट्रातील एस.टी.आगाराच्या जागेच्या खासगीकरणाचा घाट परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घातलेला आहे. महाराष्ट्रातील तालुक्याच्या किंवा लहान शहराच्या मध्यभागी एस.टी.आगाराच्या मालकीच्या हजारो एकर जागा आहेत. त्याला भारताचे नियंत्रक महालेखा परीक्षकांनी (कॅग) यांनी सरकारी जागांचे खासगीकरण करताना योग्य प्रकारे त्याची दखल घेतली जात नाही असे ताशेरे केले आहेत. त्या जागा उद्योगपतींना देण्यासाठीच सरकारची खटाटोप चालू आहे. एस.टी. ही गोरगरीब लोकांची जीवनवाहीनी आहे. तिला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याऐवजी सरकारने ते उद्योगपतींच्या घशात घालण्याचा घाट घातला आहे. त्या ऐवजी महाराष्ट्र सरकारने तुकाराम मुंडे यांच्यासारख्या कर्तव्यकठोर, प्रामाणिक



अधिकाऱ्याची समिती नेमून सरकारनेच स्वतः त्या एस.टी.आगाराच्या जागेचा विकास करावा. त्यामुळे एस.टी. आर्थिक तोट्यातून बाहेर पडण्यास मदत होईल आणि खासगीकरण थांबविता येईल. कारण, यापुर्वी खासगीकरणातून विकसीत करण्यात आलेल्या एस.टी.च्या जागेचा पुर्वानुभव फारसा चांगला नसल्याचे एस.टी.च्याच अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी सांगण्यात आले आहे. श्वेतपत्रिका काढून एस.टी.कशी नफ्यात आणतो आहोत हे आशेचे गाजर फसवे आहे. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे जेव्हा विरोधी पक्षनेता होते. तेव्हा त्यांनी 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे' सरकार मध्ये विलिनीकरण करण्याची मागणी केली होती. तेच मा.देवेंद्रजी फडणवीस आता मुख्यमंत्री असताना मात्र एस.टी.महामंडळाच्या जागा ह्या विकासाच्या नांवावर उद्योगपतींना कवडीमोल किंमतीमध्ये विकण्याचा घाट घालत आहेत. हे खासगीकरण थांबविले नाही. तर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.डॉ.सुरेश माने साहेब यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रामध्ये फार मोठे आंदोलन उभे करील. आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील. असा इशारा बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव ॲड.माणिक बन्सी आदमाने (अंबाजोगाई) यांनी दिला आहे. सदरील निवेदनावर ॲड.वसंत हजारे, राजाभाऊ आदमाने, भारत (मामा) होके, अमोल तरकसे, अविनाश ओव्हाळ, प्रकाश शिंदे, लक्ष्मण वाघे, विठ्ठल तरकसे, सचिन मस्के, सिध्दार्थ होके, बाळासाहेब होके, अमर होके, अशोक शिंगाडे, सुनिल होके, अमोल आदमाने, प्रमोद आदमाने आणि अरविंद आदमाने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तुलसी फॅशन कॉलेजमध्ये 'एक पेड़ माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण




प्रतिनिधी । बीड

देवगिरी प्रतिष्ठान संचालित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे पर्यावरण दिनानिमित्त एक पेड़ माँ के नाम या संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण कार्यक्रम शनिवार, ३० जून २०२५ रोजी उत्साहात पार पडला.

या उपक्रमाअंतर्गत फळझाडे व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाले. यावेळी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने झाडं लावणं हे केवळ जबाबदारी नव्हे, तर एक सामाजिक कर्तव्य असून प्रत्येकाने यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.श्वेता वंजारे यांनी केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षलागवड, संगोपन आणि संवर्धन यावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी मिळून भविष्यात अधिकाधिक वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला.



## तुलसी महाविद्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन

प्रतिनिधी । बीड

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व 'हरित क्रांतीचे प्रणेते' म्हणून ओळखले जाणारे वसंतराव नाईक यांची जयंती दिनांक १ जुलै रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेचे प्रतिनिधी इंजि .दीपंकर रोडे आणि प्राचार्य प्रा.डी. जी. निकाळजे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनीही पुष्प अर्पण करत त्यांच्या कार्यास विनम्र अभिवादन केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थितांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याची आठवण करून त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे स्मरण केले.

## पोलीस प्रशासनाने त्यांनाही वेळेचे बंधन लावावे – परशुराम गुरखुदे

प्रतिनिधी । बीड



वेळेची मर्यादा ११ परंतु भल्या पहाटे ४ पर्यंत टर्फ खेळ चालू राहतो.अर्ध्या रात्रीपर्यंत खेळून घराकडे जाणाऱ्या तरुणांच्या सुरक्षेचे काय ? बीडमधील टर्फवाल्यांनो वेळ पाळा, रात्र-रात्र खेळायला लावून नुसते पैसे कमवायचे बघू नका असे खुले आवाहन परशुराम गुरखुदे यांनी केले आहे.

शहरात सध्या टर्फ मैदानाची संख्या वाढत आहे. लहान, मोठ्या खेळाडूंसाठी ही बाब चांगली असली तरी काही टर्फ रात्री उशिरापर्यंत चालतात. सकाळपासूनच खेळाडू आपल्या ग्रुपप्रमाणे नोंदणी करतात. वेटींग नुसार रात्री उशिरापर्यंत त्यांचे नंबर येतात. रात्री १२ वाजता नंबर आला तर मध्यरात्री २ ते ३ पर्यंत तरुण खेळतात आणि तिथून पुढे घराकडे जातात. अशावेळी त्या तरुणांच्या सुरक्षेचे काय ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. त्यामुळे बीडमधील टर्फवाल्यांनी, वेळा पाळणे आवश्यक आहे. रात्र रात्र खेळायला लावून नुसते पैसे कमवायचे बघू नये. तुमच्याकडे खेळायला येणाऱ्या शाळकरी मुलांसह तरुणांची सुरक्षा देखील महत्वाची आहे. दरम्यान पोलीस प्रशासनाने शहरातील सर्व टर्फ धारकांसाठी नियमावली तयार करावी असे आवाहन देखील परशुराम गुरखुदे यांनी केले आहे.

## जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील तीन कर्मचारी सेवानिवृत्त



शिक्षण विभागाच्या वतीने निरोप समारंभ

प्रतिनिधी । अंबड

दि.१ जुलै रोजी जालना जिल्हा परिषद शिक्षण विभागातील प्राथमिकचे उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, वरिष्ठ लिपिक बाबूराव पिल्लई, कनिष्ठ लिपिक पंजाब खिल्लारे यांचा सेवा काळ संपल्याने सोमवार दि.३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील तीनही कर्मचारी एकाच दिवशी सेवावृत्त झाले असल्याने त्यांचा निरोप व सत्कार समारंभ जिल्हा परिषदेच्या जालना सभागृहात आयोजित करण्यात आला होता.जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील प्राथमिकचे उपशिक्षणाधिकारी देशमुख, वरिष्ठ लिपिक पिल्लई, कनिष्ठ लिपिक पंजाब खिल्लारे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला यावेळी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

## अँड. राज पाटील यांना पहाट फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । वडवणी

बीड जिल्ह्यातील लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष आणि प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते अँड. राज पाटील यांना पहाट फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार शनिवारी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांना गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील पहाट फाउंडेशन ही सामाजिक कार्यात कार्यरत असलेली प्रतिष्ठित संस्था असून, ती दरवर्षी महाराष्ट्रभरातून समाजसेवेतील उत्कृष्ट कार्यकर्त्यांचा सन्मान करते. यंदा अँड. राज पाटील यांच्या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले. राज पाटील हे वडवणी तालुका विकास समिती, उतराई महोत्सव आणि लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून निसर्गसंवर्धन, जलसंधारण, शेती रस्ते, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य व आरोग्यविषयक साहित्य पुरवण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. त्यांनी आजपर्यंत हजारो वृक्षांचे वाटप केले असून, समाजात रक्तदानासह अवयव दान व मरणोत्तर देहदान जनजागृती सोबत, स्वतः ५० वेळा रक्तदान केले आहे, २७ वेळा रक्तदान शिबिर आयोजन




व अवयव दान, मरणोत्तर देहदान फॉर्म भरला आहे.गावचे सरपंच म्हणून कार्य करताना त्यांनी सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शेकडो सरपंचांच्या समस्या मांडून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांसाठी, शेती रस्ते व जलसंधारणाच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या लढ्यातही गेल्या पाच वर्षांपासून त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे.पुरस्कार वितरण सोहळा बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन येथे शनिवारी दुपारी दोन वाजता अत्यंत थाटामाटात पार पडला. या वेळी इको फ्रेंडली व्हिलेजचे निर्माते तथा सलाई बनचे संस्थापक श्री. मनजीत सिंग सिख, लोणार-मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात, मिसेस इंडिया विजेत्या श्वेता परदेशी, बुलढाणा पत्रकार परिषदेचे जिल्हा अध्यक्ष रणजीत सिंह राजपूत, प्राचार्य हरीश साखरे, मोगरा फुलला फेम सचिन देवरे आणि कृषी समृद्धी फाउंडेशनचे महेंद्र सौभागे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. अंभरून गावात वृक्षारोपण, बस स्टँड येथे पथनाट्य व राज्यस्तरीय, पर्यावरण परिषद, पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी पहाट फाउंडेशनचे संचालक अमोल भिलंगे, संचालिका अर्पिता सुरडकर, संचालक सोमनाथ चौधरी आणि त्यांच्या कार्यतत्पर टीमने विशेष परिश्रम घेतले.

हा पुरस्कार टीमवर्कचा...

आम्हाला आतापर्यंत अनेक पुरस्कार राज्यातील विविध भागांमध्ये मिळालेले आहेत. हे सर्व पुरस्कार केवळ माझ्या स्वतःच्या कामाचे नसून माझ्यासोबत अविरत काम करणाऱ्या लढा दुष्काळाशी टीमच्या प्रयत्नांचे फळ आहे. माझ्या सोबतच्या सर्व टीम मुळेच हे सर्व काम आम्ही वेळेवर करू शकलो, माझ्यासोबत समस्त सामाजिक क्षेत्रात काम करणारा मित्रपरिवार, वडवणी व बीड जिल्ह्यात पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम करणारा मित्रपरिवार या सर्वांच्या अथक प्रयत्नाने व सहकार्याने आम्ही जिल्ह्यासह राज्यात सामाजिक प्रश्नावर काम करत असतो, हे श्रेय सर्वांचे असल्याने हा पुरस्कार मित्रपरिवाराला समर्पित ..


अँड राज पाटील
अध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य

## व्हिपीके उद्योग समूहाच्या वतीने ऊस उत्पादकांसाठी पुणे येथे होत असलेल्या प्रशिक्षनास जिल्ह्यातून हजारो शेतकरी जाणार - कवळे गुरुजी

धर्माबाद / अशोक पडोळे

व्हिपीके उद्योग समूहाच्या वतीने ऊस उत्पादकांसाठी पुणे येथे होत असलेल्या प्रशिक्षनास जिल्ह्यातून हजारो शेतकरी जाणार असल्याचे आपल्या उद्योग समूहाचे चेअरमन श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी म्हटले आहे.

व्हि पी के उद्योग समूहातील तिन्ही कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सूचित करण्यात येते की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हि एस आय) मांजरी पुणे येथे ऊस शेती ज्ञानयाग प्रशिक्षण दि १५/०७/२०२५ ते १८/०७/२०२५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले आहे.




चार दिवस निवासी प्रशिक्षण असल्या मुळे राहण्याची व जेवणाची सोय त्याच ठिकाणी आसेल.सदर प्रशिक्षणात ऊस लागवड व उसाचे संपूर्ण व्यवस्थापन कसे करावे याचे शास्त्रज्ञा द्वारे सखोल मार्गदर्शन व प्रात्यक्षिक दाखवले जातात त्या अनुषंगाने आपल्या भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे या हेतुने प्रशिक्षणास जाणाऱ्या शेतकऱ्याच्या खर्चाची निम्मी रक्कम करखण्या मार्फत भरण्याचा निर्णय आपल्या उद्योग समूहाचे चेअरमन श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी घेतला आहे.तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.दि ०५/०७/२०२५ पर्यंत आपली नाव नोंदणी आपल्या गटातील कृषी सहाय्यक यांच्याकडे करणे बंधनकारक आहे.प्रशिक्षणाचा व प्रवासाचा निम्मा खर्च ३०००/- रूपये रोख व आधार कार्ड चे झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक आहे.कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रशिक्षणात सहभाग घ्यावा असे आवाहन करून इच्छुक शेतकऱ्यांनी प्रशिक्षणाला जाण्यासाठी श्री पडवाळे साहेब यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक ८०१०२३८०२० आणि श्री सावंत साहेब भ्रमणध्वनी क्रमांक ७४४७४६२६१४ वर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.



बीड - जिल्हा परिषदेचे नूतन उपमुख्य लेखा वित्त अधिकारी म्हणून आबासाहेब बब्रुवान घायाळ यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्यांचा सत्कार रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन च्या वतीने स्वागत करण्यात आले. या सत्कार समारंभास श्रीरंग धनवे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष, तसेच महादेव सोनवळकर, सुनील शेडूते, कादरी कदिर, प्रकाश तुरूकमारे, आदी उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वसंतराव नाईक जयंती निमित्ताने अभिवादन

प्रतिनिधी । धारूर

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्ताने श्री. माणिकराव आडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर, ग्रंथपाल प्रा. गोपाळ सगर, प्रा. जगदीश शिंदे, प्रा. वैरागे, प्रा. राम लोखंडे, श्री. युवराज जाधव, डॉ. विलास चौधरी, श्री. पंडित, श्री. सुरेश जोगदंड, श्री. संजय गुरव, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार, सदस्य प्रा. नागोराव वाघमारे, डॉ. नितीन कुंभार, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, डॉ. राहुल साळवे, डॉ. डी. बी. जाधव यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी । बीड

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये येत्या दि.१७ जुलै रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अ.भा.म. नाट्य परिषद, के.एस.के. महाविद्यालयाचा उपक्रम

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या



जीवनात आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, त्यासाठी डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ.राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, डॉ.अनिता शिंदे ७२७८३०५०५०, प्रा.विजय राख ९८३३३४५८०९, सुरेश थोरात ९४२२९११०९० यांच्याशी संपर्क करावा, असे संयोजकांनी म्हटले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या हस्ते झरी येथील विविध विकास कामांचे उद्घाटन



परभणी: . महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध विकास कामे सुरु आहेत. ग्रामविकास राज्यमंत्री योगेशजी कदम यांच्याकडून ग्रामविकासाअंतर्गत अल्पसंख्याक निधी मूलभूत सुविधेसाठी परभणी विधानसभेतील मौजे झरी येथे सी सी रस्त्याच्या कामासाठी १० लक्ष व सोलार हायमस्टसाठी ४५ लक्ष निधी उपलब्ध करून त्याचे उद्घाटन आज शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या हस्ते करण्यात आले. झरी येथील नागरिक मागील अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांपासून वंचित होते. परंतु नागरीकांच्या मागणीनुसार येथील अनेक कामे आनंद भरोसे यांनी मार्गी लावली आहेत.

याप्रसंगी आनंद भरोसे यांनी मनोगत व्यक्त करताना ग्रामीण भागाच्या वाढत्या नागरीकरणाचा विचार करुनच नियोजनबद्ध विकास करण्याचा प्रयत्न सातत्याने मी करत आहे. झरी येथे अंतर्गत पांदन रस्त्यासाठी ५४ लक्ष निधी मंजूर झाला असून लवकर त्याचेही भूमिपूजन करण्यात येईल, मागील निवडणुकीत झरी सर्कल मधून शिवसेनेला चांगले मताधिक्य मिळाले असून येणारी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत झरी सर्कल वर शिवसेनेचा दावा असेल. तसेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना जास्तीत जास्त मताधीक्यांने निवडून द्यावे असे संबोधीत केले व येत्या काळात २५१५ निधी अंतर्गत झरी सर्कलमध्ये १ कोटी निधीचे विकास कामे करण्यात येतील, असे आनंद भरोसे यांनी आश्वासित केले. तसेच यावेळेस शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रल्हादराव होगे पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांनी दिलेल्या निधीतून होणारे काम दर्जेदार व उत्तम गुणवत्ता दर्जाचे होईल असे यांनी आश्वासन दिले.

या कार्यक्रमास यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, उपजिल्हाप्रमुख श्री. प्रल्हादराव होगे पाटील, तालुकाध्यक्ष श्री. प्रभाकरराव कदम, सरपंच श्री. दिलीपराव देशमुख, महेश महाराज मठपती, अशिफ कुरेशी, सलीम भाई कुरेशी, शेख नजीर, पप्पु सोनवणे, अभी मालीपाटील, पोलीस पाटील नवले, शैलेश ठाकूर, सर्कल प्रमुख विष्णू शिंदे, प्रमोद सोनवणे, कैलास वैद्य, खंडू वाघमोडे, संजय उफाडे, दादाराव मुळे, परमेश्वर महाराज, हनुमान जाधव, विठ्ठल हेंडगे, दिगंबर महाराज, रणजीत परिहार, गणपतसिंह परिहार, पप्पु बावरी, नरेश देशमुख, दत्तराव कदम, प्रकाश वाणी, सोनू सावंत आदि गावातील जेष्ठ नागरिक, महिला व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.




प्रतिनिधी । जालना

तालुक्यातील सावंगी तलान येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत हरितक्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितानी वसंतराव नाईक यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विठ्ठल मेंढरे यांनी तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच प्रभू आप्पा रंधवे तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष अनिल राठोड त्याचबरोबर कचरू रंधवे, बाळु हरकळ, राजू डोंगरे ,अफरोज बागवान इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रमोद साठेवाड ,प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रमोद पवार तर आभार प्रदर्शन श्रीमती अश्विनी पाटील यांनी केले

# मृत्यूशी सुरू असलेली झुंज १५२ दिवसांनी संपली

## ग्रामीण बँकेचे कॅशियर सुरेश दासरवार यांचे निधन

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबादचे रहिवासी तथा महाराष्ट्र ग्रामीण बँकेत कार्यरत रोखपाल सुरेश विठ्ठलराव दासरवार यांची मृत्यूशी सुरु असलेली झुंज अखेर १५२ दिवसानंतर संपली संपली. रविवार दि.२९ जून रोजी पहाटे उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. ते ५७वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ भाऊ, ३ मुली, मुलगा, जावई असा मोठा परिवार आहे. २७ जानेवारी २५ रोजी रोजी सुरेश दासरवार यांना बँकेत कर्तव्यावर असताना अचानक भोवळ आली व ते बेशुद्ध पडले. दवाखान्यातील चाचणीनंतर त्यांना ब्रेन ट्यूमर असल्याचे समजले. नंतर त्यांच्यावर उदगीर, सोलापूर, संभाजीनगर येथे उपचार करण्यात आले. पण त्यांच्या




प्रकृतीने उपचाराला साथ न दिल्यामुळे दि.२९ जून रोजी सुरेश दासरवार यांची मृत्यूशी सुरू असलेली झुंज तब्बल १५२ दिवसानंतर संपली. त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकाली निधनाने मुक्रमाबाद शहरासह परिसरावर शोककळा पसरली आहे. कर्तव्यदक्ष, मनमिळावू व हसतमुख चेहरा म्हणून परिचित असलेले व सर्वसामान्य शेतकऱ्यांना, बँकेतील ग्राहकांना सोबत घेऊन चालणारे कॅशियर म्हणून त्यांची बँकेत ख्याती होती. रविवार दि.२९ जून रोजी मुक्रमाबाद येथील लेंडी नदीच्या तीरावर सुरेश दासरवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामीण बँकेचे अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेल्या शक्तीपीठ महागार्ग तात्काळ रद्द करावा अन्यथा जनआंदोलन

## प्रहार जनशक्ती पक्षाचा मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे इशारा



परभणी – महाराष्ट्रातील शेती उध्दवस्त करणारा व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेला शक्तीपीठ महामार्ग तात्काळ रद्द करावा कारण या महामार्गामुळे परभणी जिल्ह्यातील पूर्णा, परभणी व सोनपेठ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सुपीक जमीन कवडीमोल भावाने विकत घेवून त्या जमीनीचे रूपांतर कॉंक्रीटच्या जंगलात करण्याचा सरकारचा डाव आहे. शिवाय या मार्गावरील झाडांचे मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जाणार आहे यामुळे निसर्गाचा समतोल ही बिघडणार आहे.विधानसभा निवडणुकीच्या अगोदर शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याचा निर्णय याच सरकारने घेतला होता परंतु शक्तीपीठ महामार्ग उभारणाऱ्या कंत्राटदार कंपनी कडून टक्केवारीच्या मलिदयामुळेच शक्तीपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या माथी मारून सुपीक जमिनी उद्ध्वस्त करून जिल्ह्यातील शेतकरी संपविण्याच पाप राज्य सरकार करीत आहे. त्यामुळे शक्तीपीठ महामार्ग तात्काळ रद्द करावा या मागणीचे निवेदन प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना देण्यात आले संबंधित निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे.शक्तीपीठ महामार्गवर होणाऱ्या एकुण ८६ हजार कोटी रूपयामध्ये महाराष्ट्रातील सर्वच रस्ते काचेसारखे गुळगुळीत होवू शकतात. परंतू कंत्राटदार पोसण्यासाठी व सुपीक जमिनी व शेती उध्दवस्त करण्यासासाठी सरकारने शक्तीपीठ महामार्ग उभारण्याचा एकतर्फी घाट घातला आहे. सरकारच्या या निर्णयाचा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निषेध करून शक्तीपीठ महामार्गाला पुर्णतः विरोध असून शेतकऱ्यांच्या हितासाठी हा महामार्ग तात्काळ रद्द करावा अन्यथा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने शक्तीपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांसह जिल्हाभरात सरकारच्या विरोधात जनआंदोलन उभे केले जाईल. व यावेळी जो कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारची राहील याची नोंद घ्यावी. असा इशारा आहे या निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांना देण्यात आला आहे.

निवेदनावर प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, तालुकाप्रमुख उद्धव गरुड, शहरचिटणीस वैभव संघई, पिंगळी शाखा प्रमुख शंकर दामोधर, धर्मेंद्र तूपसमुंद्रे, केशव जाधव, केशव गारोडे आदींचा स्वाक्षऱ्या आहेत.

# मुलींच्या विवाह मध्ये अवास्तव खर्च करण्यापेक्षा तोच पैसा तिच्या शिक्षणावर खर्च करावा

प्रख्यात व्याख्याते शेख सुभान अली

सेलू ।प्रतिनिधी

मुस्लिम समाजात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. हि समाधानाची बाब असली तरी मुलींना गुणवत्तापूर्ण उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. मुलींच्या लग्नात तिला भेट वस्तू देण्यासाठी व जेवणावळी वर अवास्तव खर्च करण्यात येतो, सदरील खर्चाला फाटा देऊन तिचे लग्न इस्लाम मध्ये सांगितलेल्या साध्य पध्दतीने करावे. तिच्या लग्नात खर्च करण्यापेक्षा तोच खर्च तिच्या शिक्षणावर करावा असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते, मराठी मुस्लिम चळवळीचे संस्थापक अध्यक्ष, दंगा मुक्त महाराष्ट्र अभियानचे संयोजक शेख सुभान अली यांनी मुस्लिम समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव कार्यक्रम समारंभात केले.

अल फलाह एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी सेलू तर्फे मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान व इस्लामीक क्विझ कॉंन्टेस्ट स्पर्धा तसेच दहावी, बारावी, नीट, सिईटि, शिष्यवृत्ती व इतर परीक्षांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवार दिनांक २९ जुन रोजी साई नाट्यगृह महेश नगर सेलू येथे प्रसिद्ध विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते शेख महेमुद यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात शेख सुभान अली हे प्रमुख वक्ते म्हणुन बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आर्किटेक्ट शेख अरशद, ऑल इंडिया आयडल टिचर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शेख अब्दुल रहिम, मौलाना वहाब नदवी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अल फलाह एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी सेलू चे अध्यक्ष इंजिनिअर अनीस कुरेशी यांनी




केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय घौरी जावेद यांनी करुन दिला. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्ये म्हणजे खान अब्दुल गफार खान उर्दु हायस्कूल पाथरीची विद्यार्थिनींनी शेख लबिना शेख मजीद हिने अल फलाह एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी सेलू तर्फे घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान व इस्लामीक क्विझ कॉंन्टेस्ट स्पर्धेत पटकावलेले पहिले बक्षिस ७०००/ रुपये गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चासाठी अल फलाह एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी सेलू कडे सुपूर्द केले. श्रोते व प्रेक्षक यांनी गच्च भरलेल्या साई नाट्यगृहात पुरुषांसोबत जवळपास ४०० महिला भगिनी उपस्थित होत्या. या प्रसंगी अल फलाह एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी सेलूचे सदस्य व सातोना येथे कार्यरत शिक्षक शेख इमामोद्दिन निजामी हे नियत वयोमानानुसार दिनांक ३० जुन रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सचिव शफीक अली खान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख मौजम सर व बागवान हारुण सर यांनी केले तर आभार प्रदर्शन इंजिनिअर पठाण रशिद खान यांनी केले. राष्ट्र गिताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेख शमशोद्दिन, हाजी पठाण निसार, हाजी शेख रफीक, घौरी जावेद, इमरान कुरैशी, शेख असगर, जकी अहेमद सिद्दिकि अदिंनी परिश्रम घेतले.



मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मौजे चोंडी नगरीचे भूमिपुत्र पोलीस उपनिरीक्षक हणमंत मारोतराव चोंडीकर यांचे पोलिस दलातील प्रदिर्घ सेवेनंतर पोलिस उपनिरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर गावकऱ्यांच्या वतीने मायभूमीत भव्य सेवापुर्ती गौरव सोहळा व सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सेवापुर्ती गौरव सोहळ्यात चोंडी व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पोलिस उपनिरीक्षक हणमंतराव पाटील चोंडीकर यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी सतीश गोड मोतीवार जिल्हा अध्यक्ष युवा मोर्चा नांदेड प्रमुख उपस्थित प्रशांत दसरावार भाजपा मा. नगरसेवक देगलूर, दिपक संगमकर, उत्तम वाडीकर, पो.उपनिरीक्षक मारोती नंदे ,माधव पा. उमाटे, शेरखान याशिनखान पठाण, राजू पा.उद्रीकर, उपसरपंच राम शिरूरे,पत्रकार ड. रणजित जामखेडकर मा.सरपंच विनायक पाटील,राम सावकार पबितवार, चेअरमन बालाजी बसापुरे, रामराव कंधारे, शिवकांत देवकते, प्रा.राजेश अचेगावे, पोलीस पाटील सचिन कांबळे, राजासाब शेख तसेच गावातील गजानन पा त्यागमपुरे मित्र मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवा चोंडीकर, संगम अचेगावे माधव देवकते, अजय शिवपुजे,यासिनखान पठाण, मुजाहिद चोंडीकर, रामनाथ देवकते, शुभम देवकते, हणमंत नंदे, नागमोडे चंद्रकांत, मुसा शेख, शबीर शेख, गंगाधर चिटकलवार, दिलीप त्यागमपुरे, सुलेमान शेख, शिवदास बोडके,नागनाथ चिटकलवार यांच्या सह गावातील लहान थोर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कृषिक्रांतीचे अग्रदूत: वसंतरावजी नाईक ( १जुलै जयंती विशेष)

शेतकरी हा भारतीय समाज व्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी जगला तरच देश जगेल.शेतकरी व शेतीच्या विकासासाठी त्यांनी जिवाचे रान केले. राजकीय क्षेत्रात त्यांनी सर्वसामान्य माणसाला लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनविले.व लोकशाहीच्या विकेंद्रीकरणावर भर दिला. शेतकरी सुखी तर देश सुखी हा मूलमंत्र उराशी बाळवून त्यांनी शेती उत्पादनात प्रचंड वाढ करण्या साठी समाज हिताचे अनेक निर्णय हाती घेतले.प्रत्येक तरुणाला काम मिळावे. म्हणून कृषिक्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या.पाणी अडवा,पाणी जिरवा,धवल क्रांती, हरितक्रांती यासारख्या कायमस्वरूपी योजना त्यांनी राबविल्या.

’जर दोन वर्षात राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केलं नाही तर शनिवार वाड्यात मला फाशी द्या.असे स्पष्ट पणे बोलणारे हरितक्रांतीचे जनक कै.वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा घेतलेला आढावा. वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी ता.पुसद मधील गहुली या छोट्याशा खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव फुलसिंग व आईचे नाव होणुबाई होते. त्यांचे कुटुंब सधन होते. त्यामुळे त्यांनी त्या काळामध्ये कायद्याचे शिक्षण शिकले. विदर्भात त्यांनी काही ठिकाणी वकिली केली.१९५९ साली गोरगरिबांना शिक्षण मिळावे,

प्रत्येक विद्यार्थी हा शिकलाच पाहिजे. शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे.कोणीही अज्ञानी, निरक्षर राहू नये हा हेतू मनात ठेवून जो शिकला,तोच टिकला या सुभाषिता प्रमाणे त्यांनी वडिलांच्या नावावर पुसद येथे फुलसिंग महाविद्यालयाची स्थापना करून विद्यार्थ्यांना घडवण्याचे पवित्र कार्य हाती घेतले. त्यांच्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटत होता. म्हणून ते पुसद येथेच पुढील काळात नगराध्यक्ष झाले. पुढे रयतेने त्यांना विधानसभेवर भरघोस मतांनी निवडून दिले. हा त्यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी होता.नंतर ते राज्याच्या राजकारणात सक्रिय झाले.त्याच वेळेस १९५२ ते १९५७ मध्ये मध्यप्रदेश विधान सभेत महसूल मंत्री म्हणून त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे कार्य केले. तद्नंतर १९५७ ते १९६० मध्ये तत्कालीन द्विभाषिक मुंबई राज्याचे कृषिमंत्री मंत्री म्हणून त्यांची निवड झाली. आवडीचे खाते मिळाले म्हणून त्यांनी अतिशय चांगलं कार्य केले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.आणि महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले.कै.मारोतराव कन्नमवार मृत्यू पावल्या नंतर त्यांची महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या कारकिर्दी मध्ये त्यांनी शेतकऱ्याला अतिशय सन्मानाची वागणूक दिली.१९७२ चा दुष्काळ आठवला की पोटात कळा येऊ लागतात. त्या काळात त्यांनी दुष्काळग्रस्त महाराष्ट्र राज्याचा कारभार अतिशय सचोटीने पाहिला. शेतकऱ्यांना भरभरून मदत केली. शेतकरी सुखी असेल तर आपण सुखी राहु, असे त्यांनी प्रतिपादन केले. एका बाजूला दुष्काळ असला तरी त्यांनी त्या काळात शेतकऱ्यांना अन्नधान्य कमी पडू दिले नाही. ही विशेष बाब सांगावी वाटते. म्हणूनच त्यांना हरित क्रांतीचे जनक म्हणून आज सर्वत्र ओळखले जाते. शिक्षकाचे स्थान समाज व्यवस्थेत महत्त्वाचे आहे.शाळा व शिक्षक यांना सर्वांनी श्रद्धास्थाने मानले पाहिजेत. असे त्यांचे मत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडलेला होता. त्यामुळे ते ग्राम स्वच्छता, शेतीचा विकास, अज्ञान दूर करणे, सर्वानी एकत्रित येणे असे अनमोल विचार त्यांनी समाजासमोर ठेवले होते.महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून बांधा-बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांना मदत केली. म्हणून त्यांच्या कार्याचा सुगंध वर्षानुवर्ष दरवळत आहे. त्यांची कीर्ती वाऱ्यासंग जात आहे. सत्य लोप पावत नसते. ते आणखी ही जिवंत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी चीन, युगोस्लाव्हाकिया अमेरिका अशा अनेक देशाचे यशस्वी दौरे केले. ते पहिले शेतकरी मुख्यमंत्री म्हणून त्यांची गणना केली जाते.समाजसेवेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीला कोणीही विसरू शकत नाही.खरोखरच आपले आयुष्य हे समाजाच्या सेवेसाठीच आहे. म्हणून त्यांनी अहोरात्र परिश्रम केले. त्यामुळेच ते पुढे वाशिम मतदार संघातून १२ मार्च १९७७ मध्ये लोकसभेवर निवडून गेले.

महाराष्ट्र सरकारने यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास व मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथे त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केलेला आहे. तसेच त्यांच्या कार्याचे नेहमी स्मरण व्हावे म्हणून १ जुलै रोजी त्यांचा जन्मदिन कृषि दिन म्हणून यापुढे साजरा करण्यात येईल.

असे सांगितले. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळा मार्फत कर्ज योजना सुरू करण्यात आली. ’महानायक वसंत तू’ हा त्यांच्या कार्यावर काढलेला चित्रपट अतिशय गाजला. ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ पर्यंत तीन वेळा महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून नावा रूपाला आले. ते एक महान विचारवंत होते. कृषी क्षेत्रात केलेल्या आमुलाग्र सुधारणेमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असे. शेतकरी राजांना त्यांनी कधी ही दूर केले नाही. आजची परिस्थिती आपण पाहत आहोत.शेतीमालाला कवडीमोल भाव दिले जात आहेत. दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत.तरी शेतकऱ्याकडे शासन म्हणावे तेवढे लक्ष देत नाहीत. अशी अवस्था निर्माण झाली आहे. बी-बियाण्याच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली आहे.शेतीत होणारा खर्च आणि येणारा नफा यांचा ताळेबंद कुठेही जुळताना दिसत नाही. म्हणून तर शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. कै.वसंतरावजी नाईक यांच्या काळात कोणत्याही ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. ही विशेष बाब आहे. त्या काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यामुळेच ते हरित क्रांतीचे जनक झाले. असे आपणाला आज ठामपणाने सांगता येईल. लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान,जय किसान ही घोषणा दिली होती. जोपर्यंत किसान या देशांमध्ये जिवंत आहे. तो पर्यंत आपल्याला काही कमी पडणार नाही? अशी ती घोषणा होती. आज शेतकरी आंदोलन करीत आहेत, तरी त्या आंदोलना कडे दुर्लक्ष केले जात आहे. ही बाब मनाला खंत वाटणारी आहे.आज धनधान्याला,भाजीपाल्याला, फुले फळांना शेतकऱ्यांच्या योग्य भाव मिळत नाही. ही जबाबदारी कोणाची आहे. का होत आहे असे. जागतिकीकरण,उदारीकरण, खाजगीकरण झाले असले तरी महाराष्ट्रातला शेतकरी गरीबच राहिलेला आहे. वसंतराव नाईकांचा पुन्हा काळ येईल काय? असे आपल्याला वाटत आहे. शेतकऱ्यावर येणारे सर्व आस्मानी व सुलतानी संकट त्यांनी बाजूला सारले होते. त्यामुळेच त्यांना कृषि संत असेही महाराष्ट्रातील जनता आदराने म्हणत होती. दुष्काळामध्ये केलेल्या कार्याचा आढावा घेऊन तसेच अकरा वर्षे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री म्हणून वसंतरावजींनी जे कार्य केले त्या कार्याचा यथोचित गौरव करण्यासाठी त्यांना ’भारतरत्न’ हा सर्वोच्च नागरी पुरस्कार द्यावा असे जनतेचे मत आहे. हरित क्रांतीचे प्रणेते,कृषि संत, पंचायत राज व्यवस्थेचे जनक,महाराष्ट्राचे थोर नेते कै.मुख्यमंत्री वसंतराव फुल सिंग नाईक यांचा मृत्यू १८ ऑगस्ट १९७९ रोजी सिंगापूर येथे ६६ व्या वर्षी झाला. आज त्यांच्या जयंतीनिमित्त विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता.मुखेड यांच्यावतीने त्यांना विनम्र अभिवादन.

शब्दांकनप्रा.बरसमवाड विठ्ठल गणपत संस्थापक अध्यक्ष: विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता.मुखेड

# विजय चित्ते यांचे शैक्षणिक कार्य प्रेरणादायी -बाळासाहेब खरात

प्रतिनिधी । जालना

विजय चित्ते यांचे आपल्या सेवा कालावधीतील शैक्षणिक कार्य अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी असून सरांनी यापुढेही आपले शैक्षणिक व सामाजिक कार्य असेच सुरू ठेवावे असे प्रतिपादन माध्यमिक शिक्षणाधिकारी जालना श्री बाळासाहेब खरात यांनी केले आहे.

वाघ्रूळ जहागीर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री विजय संपतराव चित्ते यांनी वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्यामुळे नियत वयोमानाप्रमाणे ते आज दिनांक ३० रोजी सेवानिवृत्त झाले आहे त्यामुळे त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता सोहळा वाघ्रूळ केंद्रातील सर्व शिक्षक वृंदांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे




अध्यक्ष श्री. दीपक खरात हे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री बाळासाहेब खरात शिक्षणाधिकारी माध्यमिक,मा.श्री.बबनराव खरात माजी जि.प.सदस्य,मा.श्रीमती सुषमाताई खरात माजी पं.स.सदस्य,श्री गजानन खरात,श्री विलासराव खरात सरपंच वाघ्रूळ,श्री सुधाकर खरात सरपंच कुंभेफळ,श्री अनिल निलख सरपंच निमगाव गुरु,श्री गोविंद खरात उपसरपंच,माननीय डॉ. भरत वानखेडे शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती जालना ,मा. श्रीमती गीता नाकाडे शिक्षण विस्तार अधिकारी,मा.श्री राम खराडे शिक्षण विस्तार अधिकारी जाफराबाद,मा.श्री अशोक इंगळे केंद्रप्रमुख वाघ्रूळ,मा. श्री विश्वनाथ तिडके केंद्रप्रमुख, मा. श्री सुनील ढाकरके, श्री भागवत जेठेवाड, श्री अशोक गायकवाड ,सावंगी तलाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री प्रमोद पवार, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्री मंगेश जैवळ,श्रीमती साधनाताई गिर्हे-जैवळ,प्राथमिक शिक्षक संघाचे श्री शांतिलाल गोरे, शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष श्री देवेंद्र बारगाजे, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष श्री मधुकर काकडे,कास्ट्राईब संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री जगन्नाथ हनवते त्याचबरोबर श्री राजेश मुंगी पैठणकर, प्रहार शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मुकुंद खरात यासह जालना जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी, निमगाव गुरु तसेच वाघ्रूळ ज.येथिल ग्रामस्थ तसेच जिल्ह्यातील शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आपल्या भाषणांमधून विविध वक्त्यांनी श्री विजय चित्ते यांच्या संपूर्ण सेवा कालावधीतील दैदिप्यमान कामगिरीचा गौरव केला त्याचबरोबर श्री बाळासाहेब खरात,श्रीमती गीता नाकाडे, डॉक्टर भरत वानखेडे यांनीही श्री विजय चित्ते यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले.तसेच अनेक व्यक्तींनी त्यांच्या जीवन व सेवा कालावधीतील अनेक आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रमोद नाईक यांनी, प्रास्ताविक श्रीमती मंजूषा खरात यांनी तर आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर घुमरे यांनी केले.कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्री. सारंगधर डोके तसेच केंद्रीय प्राथमिक शाळा वाघरुळ येथील सर्व स्टाफ व केंद्रातील सर्व शिक्षक वृंदांनी परिश्रम घेतले.

# बेंबळ्याची वाडी येथे आंब्याच्या कलम बांधणी'

## प्रात्यक्षिकाला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद

प्रतिनिधी । बदनापुर

कृषी महाविद्यालय, बदनापूरच्या कृषी दूतांनी नुकतेच बेंबळ्याचीवाडी ता, जि,छत्रपती संभाजीनगर ,येथे २८जुन २०२५ शेतकऱ्यांसाठी आंब्यामध्ये 'कलम बांधणी' (त्रीरषींळपस) आणि 'बडिंग' (ईीववळपस) या महत्त्वाच्या तंत्राचे प्रात्यक्षिक यशस्वीरित्या आयोजित केले होते . या प्रात्यक्षिकाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना आंब्याच्या झाडांची गुणवत्ता आणि उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हा होता.

या प्रात्यक्षिकादरम्यान, कृषिदूत आदित्य मापारी, प्रदीप सिंगल पृथ्वीराज राठोड, अभिषेक वाघमारे, चेतन साळवे हे विद्यार्थी उपस्थित होते ह्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना 'ग्राफ्टिंग' (कलम बांधणी) करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली. यामध्ये, चांगल्या प्रतीचे 'सायॉन' (डलळेप - कलमासाठी निवडलेली फांदी) कसे निवडावे, 'रूटस्टॉक' (ठेीं- ीींलज्ञ - ज्या झाडावर कलम करायचे आहे) कसे तयार करावे, आणि सायॉन व रूटस्टॉकचे योग्य पद्धतीने जोडणी करून यशस्वी कलम कसे करावे, याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व्हेनियर ग्राफ्टिंग आणि साईड ग्राफ्टिंग. यांसारख्या पद्धतींची माहिती दिली, तसेच त्यासाठी आवश्यक असणारी साधने आणि घ्यावयाची काळजी यावरही भर दिला.

या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने आंब्याच्या झाडांची




वाढ झपाट्याने होते, फळांची गुणवत्ता सुधारते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत शेतकऱ्यांना कमी वेळात अधिक आणि दर्जेदार उत्पादन मिळू शकते.

या उपक्रमासाठी कृषी महाविद्यालयाचे संयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.डी. के. पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. डी. देशमुख, अधिकारी डॉ. एस .जे .सुपेकर, व डॉ. श्रुती वानखेडे, यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले व प्रात्यक्षिका दरम्यान तेथे उपस्थित बेंबळ्याच्या वाडीचे शेतकरी विठ्ठल डोभाळ, चंदनसिंग डोभाळ, कारभारी नायमने, कारभारी गुशिंगे ,विठ्ठल बहुरे व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भ.महावीर चौकाचे व संयम कीर्ती स्तंभाचे लोकार्पण

प्रतिनिधी । अंबड

अंबड येथे आचार्य विद्यासागर महाराज यांचा ५८ व्या दीक्षा दिवसा निमित्ताने सकल जैन समाज अंबड यांचा कडून अंबड जालना रोडवर भव्य ३५ फुटांचे भगवान महावीर चौक व आचार्य विद्यासागर महाराज यांचे संयम कीर्ती स्तंभाचे लोकार्पण करण्यात आले. या पवित्र दिवशी संपूर्ण खाटीक समाजांनी आपली मांस विक्री ची दुकाने सुध्दा बंद ठेवली श्री भगवान महावीर मंदिर परिसरात अभिषेक पूजन व आचार्य विद्यासागर यांचे पूजन झाले या नंतर मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले मुनिश्री विरसागर महाराज यांचा द्वारे लिखीत भक्ती कैसे करे पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले नंतर मुनिश्री विरसागर महाराज यांचे प्रवचन झाले या प्रवनात आचार्य विद्यासागर महाराज यांचा जीवनातील अनेक प्रसंग सांगुन मुनिश्री ने त्यांचे



कार्य सांगितले जसे जेलमधील कैदी व आदिवासी लोकांन साठी उघड्लेले हातकरघा जीव दये साठी गोशाळा मुलींचा शिक्षणासाठी प्रतिभास्थली इंडिया नही भारत बोलो भारतात हिंदी भाषेच महत्व इ कार्यक्रमासाठी जितेंद्र पापळकर विभागीय आयुक्त संभाजी नगर

डॉ कल्याण काळे खासदार जालना राजेंद्र टोपे माजी आरोग्य मंत्री देवीदास कुचे नगराध्यक्ष विजय चव्हाण उपविभागीय अधिकारी विशाल खांबे डी वाय सर पी मनोज उर्कीर्डे मुख्याधिकारी न.प.अंबड भरतेश जी शहा उघोजक पुणे अतुल जी शहा उघोजक पुणे अनिलजी छाबड उघोजक जालना अजितजी इंगलवार उघोजक छ.संभाजीनगर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जिल्हा ग्राहक आयोगाचा उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि. ला दणका

प्रतिनिधी । जालना

उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि.यांनी ग्राहकास सेवा देताना अडवणूक व त्रुटी ठेवल्यावरून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने तक्रारदारास उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि. यांच्या कडून १४१८००/. रु भरपाई तसेच सेवेत कसूर केल्यामुळे ५०००/रु. व शारीक व मानसिक त्रास व अर्जाचा खर्च ५०००/ रु.देण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराच्या वतीने ॲड. सय्यद मुद्दसर व ॲड.शेख याकुब युसुफ यांनी बाजू मांडली.

याविषयी अधिक माहिती अशी की, अर्जदार यांचा दिनांक २४ एप्रिल २०२३ रोजी मुंबई येथून जालना येथे परत येत असताना त्यांच्या चारचाकी वाहनाचा अपघात झाला होता. सदरच्या अपघातामध्ये अर्जदाराच्या वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यानंतर अर्जदार यांचे वाहन उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि. यांच्या शोरुमला दुरुस्तीसाठी नेले असता त्यावेळी अर्जदाराने सदरील अपघाताची सुचना विमा कंपनीला दिली.त्यानंतर वीमा कंपनीचे कर्मचारी यांनी सदरील वाहनाचा पंचनामा केला व वाहन दुरुस्तीसाठी रक्कम मंजुर करण्यात आली व उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि. यांच्या शोरुमला दुरुस्ती करण्यात आली त्यानंतर सदरील वाहन ट्रायलसाठी नेले असता वाहनाचे ब्लॉक फुटले व इंजन खराब झाले असे शोरूम मधील कर्मचारी यांनी अर्जदाराला सांगितले. त्यानंतर पुन्हा वाहनाचे इंजिन द्रुस्ती करिता इंस्टीमेट काढण्यात आले व सदरील इंस्टीमेंट मंजुरी करिता विमा कंपनीला पाठविण्यात आले.त्यानंतर विमा कंपनीने असे सांगितले की सदरील वहानाचे अपघात झाले होते त्यावेळेस त्यांनी वाहनाचे पंचनामा केला होता त्यावेळेस इंजिन मध्ये कोणतेही खराबी नव्हती सदरील खराबी हे शोरूम वाल्या कडून झालेली आहे करिता आम्ही क्लेम मंजुर करू शकत नाही असे सागितले.त्या नंतर उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि. यांनी अर्जदारा कडून असेम्बल इंजिन करिता १४१८००/ रु उकडले.सदरील वाहनाचे इंजिन हे उज्वल (ह्युंडाई) ऑटोव्हील्स प्रा.लि. यांच्या चुकीने खराब झाले असतानाही अर्जदारा कडून सदरील इंजिनचे पेशे घेण्यात आले. त्या नंतर अर्जदाराला झालेला शारीक व मानसिक त्रास झाल्या मुळे अर्जदाराने ॲड. सय्यद मुद्दसर व ॲड.शेख याकुब युसुफ यांच्या मार्फत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे धाव घेतली.सेवेतील त्रुटी, कमतरता आणि ग्राहकास झालेला त्रास या सर्व बाबी ॲड. सय्यद मुद्दसर व ॲड.शेख याकुब युसुफ यांनी आयोगाच्या निदर्शनास



आणून दिल्या. तक्रारदारांची बाजू ऐकून घेतल्यानंतर वाहनाचे असेम्बल इंजिनचे संपूर्ण १४१८००/ रूपये ६% व्याजाने ४५ दिवसात द्यावी नसता ८% व्याजासह रक्कम द्यावी, ग्राहकास झालेल्या मानसिक त्रासापोटी ५,००० रूपये आणि खटला खर्च ५,००० रूपये असे ग्राहकास देण्याचे आदेश मा. आयोगाने दिलेले आहे.




माजलगाव :-येथील सह दुय्यम निबंधक श्री.बी.डी.दारेवार हे दि. ३०जुन २०२५ रोजी नियतकालमाना नुसार सेवामुक्त झाले.यावेळी त्यांचा तुळजाभवानी ची प्रतिमा शाल हार व पेढे भरवून यथोचित सत्कार करताना कुलकर्णी आर.डी.,राजु जाधव,नांगरे पी.एस.,वरिष्ठ लिपिक गणेश चौधरी व पत्रकार रविंद्र राऊत व कर्मचारी उपस्थित होते.



प्रतिनिधी । बीड

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून काल रात्री १२ नंतर जन्म झालेल्या बीड जिल्हा रूग्णालयातील मुलींना कपडे देऊन आणि त्यांच्या आईंचा साडी चोळी आणि केळी भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बीड जिल्हा रुग्णालयामध्ये खासदार सुप्रियाताई यांच्या वाढदिवसा निमित्त अँड. हेमाताई पिंपळे तसेच सहकारी अनिता ताई वाघमारे यांनी केक कापुन साजरा केला.यावेळी वडवणी येथील सोनाली राठोड यांनी आपल्या मुलीचे नांव सुप्रिया ठेवले त्याबद्दल त्यांचे आभार देखील या दोघींनी ताईंच्या वतीने मानले.

# ग्रामीण जागरूकता कार्यक्रम अंतर्गत

## मा.मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी महाविद्यालय बदनापुरच्या संयुक्तपणे वृक्षारोपण

प्रतिनिधी । बदनापुर

बदनापूर--- (प्रतिनिधी-संजयभुजाळ) बदनापुर तालुक्यातील आज दि.०१/०७/२०२५ मंगळवार रोजी हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी महाविद्यालय बदनापूर यांच्या वतीने अकोला (नि)येथे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्री.दिपक पाटील, डॉ.नितिन देशमुख,श्रीमती डॉ.अस्मिता सुरडकर,डॉ.श्री.राहूल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अकोला गावचे सरपंच महादू गिते, उपसरपंच दत्ता तांबे, बाजीराव नागरे, प्रकाश तांबे, बद्रीनाथ गुट्टे, दत्ता मुंढे,गणेश ढाकणे, समाधान मुंढे, बबनराव गिते,आशोक सानप आदी सह ग्रामस्थ व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने




उपस्थित होते.सदरील कार्यक्रम वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय बदनापूर येथील विद्यार्थीनी ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत घेण्यात आला.सदरील वृक्षारोपण अकोला (नि) येथे ग्रामीण जागरुकता कार्यक्रम अंतर्गत कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांनीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी कु.शितल गोरखनाथ खैरे,कु.ऋतुजा वानखेडे,कु.भाग्यशाली जाधव, कु.गायत्री खरात, कु.निकिता काळे, कु.क्रिती अरोरा, कु.स्वराली जाधव , कु.निता भांदुर्गे, कु.प्रतिक्षा वारंगुळे, कु.मनिषा राणी. कु.पुजा शर्मा या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

# पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी कार्यालय जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने कै.वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन साजरा

प्रतिनिधी । जामखेड

पंचायत समिती जामखेड व तालुका कृषी अधिकारी कार्यालय जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने मा.मुख्यमंत्री



कै.वसंतराव नाईक जयंती व कृषी दिना निमित्त आयोजित कार्यक्रमास पंचायत समिती जामखेड येथे उपस्थित राहून कै.वसंतराव नाईक यांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी इतर मान्यवरांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने उपस्थित शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले व शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी शेतकरी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ घ्यावे असे आव्हान केले.कृषी दिनानिमित्त तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने श्री.संदीप दादा उगले, सौ.सुरेखा बाळासाहेब ढवळे, श्री. बळीराम ढवळे व श्री.अशोक होडशीळ यांना मान्यवरांच्या हस्ते प्रगतशील शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शुभम जाधव गटविकास अधिकारी, घुले साहेब तालुका कृषी अधिकारी, राम जगताप साहेब कृषी अधिकारी, मिसाळ साहेब, सिध्दनाथ भजनावळे, कैलास खैरे, मल्हारी इसरवाडे आदी विस्तार अधिकारी , पत्रकार बांधव ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज आंबाजोगाई शहरातील काही परिसराचा वीजपुरवठा बंद राहील

प्रतिनिधी । अंबाजोगाई

३३ केव्ही आंबाजोगाई वीजवाहिनीवरील जिल्हा नियोजन समितीच्या अंतर्गत वीज यंत्रणेच्या स्थलांतराची कामे करण्याकरिता आज बुधवार (दि. २ जुलै) रोजी सकाळी साडेदहा ते दुपारी चार वाजेपर्यंत ११ केव्ही नागझरी वीजवाहिनीवरील परिसराचा वीजपुरवठा बंद राहणार आहे.११ केव्ही नागझरी वीजवाहिनावरील करण्यात येणाऱ्या कामामुळे आंबाजोगाई शहरातील साठे चौक,परळी वेस, भगवान बाबा चौक,कॉलेज रोड, एलआयसी कॉलनी तसेच नवाब चौक या परिसराचा वीजपुरवठा सकाळी साजेदहा ते दुपारी चार वाजे पर्यंत बंद राहील.संबंधित सर्व वीजग्राहकांनी कृपया याची नोंद घ्यावी व महावितरणला सहकार्य करावे.